प्रकरण एक

# प्रास्ताविक

१.१ संशोधन विषयाची पार्श्वभूमी

१.२ समस्येचे विधान

१.३ समस्येचे महत्व

१.४ समस्येची निवड

१.५ संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

१.६ संशोधन विषयाची उद्दिष्टे

१.७ समस्येतील पदांच्या व्याख्या

## प्रकरण एक

## प्रास्ताविक

### १.१] संशोधन विषयाची पार्श्वभूमी -

"शिक्षण" हे एक सामाजिक बदलाचे महत्वाचे साधन आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात सक्तिचे व मोफत प्राथमिक शिक्षण मिळाले नसते तर राष्ट्राचा विकास झाला नसता. या शिक्षण प्रक्रियेला स्वातंत्र्यानंतर गती आली. स्वातंत्र्यानंतर सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाचे कायदे पास झाले. मुंबई सरकारने १९४७ मध्ये ६ ते ११ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत व सक्तिचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद केली. [१]

प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा वाढला तरच विकास होतो. जग एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहे. झपाट्याने होणा-या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील बदलाची दखल घेऊन देश समर्थ व संपन्न करणारी भावी पिढी निर्माण करणारे हे आव्हान आज समाज, शिक्षक, प्रशासक यांचे समोर आहे. सध्याच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य या मूलभूत गरजाशिवाय "शिक्षण" ही एक मूलभूत गरज म्हणून मान्य झाली आहे. १० डिसेंबर, १९४८ या दिवशी सॅनफ्रान्सिस्कोत भरलेल्या आंतरराष्ट्रीय संमेलनात संयुक्त राष्ट्र संघाने मंजूर केलेल्या मानवी हक्कांच्या सनदेत "प्राथमिक शिक्षण घेण्याची संधी" या मूलभूत हक्काचा समावेश केला आहे. [२]

केवळ विकसित देशामध्येच या हक्कास मान्यता मिळालेली नसून विकसनशील देशांनीही या हक्कास मान्यता देऊन तो हक्क आपल्या नागरिकांना उपभोगता यावा या दृष्टीने प्रयत्न चालू केले आहेत. "युनेस्को" या आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत मागास व विकसनशील देशातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रसार व प्रचार कार्यास सहाय्य केले जात आहे.

"न हि ज्ञानेन् सदृशं पवित्रम् इह विद्यते।" असा ज्ञान महिमा

गाणा-या भारतीय संस्कृतीने मध्ययुगापासून ज्ञानाची मक्तेदारी निर्माण करणा-या प्रवृत्तींवर प्रहार केले आहेत. ज्ञानेश्वरांपासून ते महात्मा फुल्यांपर्यन्त सर्वांनी एकटया अविद्येचे परिणाम जनसामान्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी कठोर परिश्रम घेतले आहेत. मध्ययुगाचा उल्लेख अंध:कार युग असा केला जातो. मध्ययुगातील मुस्लिम शिक्षण निष्प्रभ ठरले. तो काळ सामाजिक दृष्टया अस्थिरतेचा व मागासलेला होता.[३]

स्वातंत्र्यपूर्व काळात पार्लमेन्टपुढे महात्मा फुल्यांनी अज्ञानी भारतीयांची शिक्षणासंदर्भातील मागणी मांडण्याची कामगिरी केली आहे. नामदार गोखले यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा व्हावा म्हणून १९१० पासून प्रयत्न केले आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील या शिक्षण भगिरथाने शिक्षणाची गंगा खेडयापाडयात, डोंगरद-यात पोहचविण्यासाठी जीवन खर्च केले आहे. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेतील ४५ व्या कलमानुसार सक्तीच्या, मोफत, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची गरज मान्य केली आहे.

मुंबई राज्याने १९४७ साली प्राथमिक शिक्षणाचा कायदा संमत केला. या कायद्यान्वये मुंबई राज्यातील प्राथमिक शिक्षणाचे नियम १९४९ मध्ये तयार करण्यात आले.[४] घटनेच्या १५ व्या कलमानुसार राज्य हे संविधानाच्या प्रारंभापासूनच्या दहा वर्षाचे कालावधीच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयास १४ वर्षे पूर्ण होईतोपर्यन्त मोफत व सक्तिचे शिक्षण देण्याची तरतुद करण्यासाठी प्रयत्नशील राहील. पण त्यासाठी ३९ वर्षाचा कालावधी गेला. ही घटना स्विकारल्यानंतर ३९ वर्षांनी केन्द्र व राज्य सरकारने प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरणाचे ध्येय गाठले. स्वातंत्र्यानंतर प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व दर्जा झपाटयाने वाढला.[५]

भारतामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी स्वातंत्र्यपूर्वकाळापासूनच स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविली आहे.

भारताप्रमाणेच जगातील अनेक राष्ट्रांमध्ये स्थानिक समित्या हा शासकीय संघटनांचाच तळातील एक घटक या नात्याने प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात, शिक्षण सुविधा पुरविण्याची अतिशय महत्वाची भूमिका पार पाडीत आहेत. भारतात लोकशाही विकेन्द्रीकरणाव्दारे सक्तिच्या, सार्वत्रिक शिक्षणाची मोठी जबाबदारी व अधिकार स्थानिक समित्यांकडे आले आहेत.

आधुनिक भारतीय शिक्षणाची जबाबदारी स्थानिक समित्याकडे येण्याची दोन प्रमुख कारणे आहेत.

१] इंग्लंडचा प्रभाव.

२] शिक्षण कार्यात राज्यसरकारच्या हस्तक्षेपास व स्थानिक समाज व राष्ट्र यांच्या संयुक्त जबाबदारीस विरोध म्हणून ही भूमिका स्थानिक समित्यांकडे आल्याचे डॉ. कोलरेट यांच्या खालील निरीक्षणावरुन दिसून येते.

"प्रशासकीय गुणवत्ता हा घटक सर्वत्र वर्चस्व गाजवीत असतो. केंद्र सरकारच्या ताब्यात शिक्षणसेवा पूर्णत: ठेवल्यास, स्थानिक अभिरुची, स्थानिक चिकीत्सा, दूर राहून साचेबंद पध्दतीचा प्रभाव वाढतो. त्यामुळे शिक्षण कायद्यांचे स्थानिक माहिती अभावी प्रभावी प्रशासन अशक्य होते. यासाठीच शासनाचे माध्यम प्रतिनिधी म्हणून प्रशासनाची जबाबदारी स्थानिक अधिका-यांवर सोपविली आहे."[६]

युनोसारख्या जागतीक संघटनेने मानवी हक्काच्या सनदेत "शिक्षण मिळणे हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे." असे नमुद केले आहे.[७] व त्यानुसार आर्थिक आणि तांत्रिक मदत देऊ केली आहे. देशाच्या प्रत्येक व्यक्तिचे प्राथमिक शिक्षण तिच्या वयाच्या ठराविक वर्षापर्यन्त व्हायला पाहिजे म्हणून देशोदेशांत सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाचे कायदे पास केले जाऊ लागले, आणि त्या त्या देशातील सरकारे सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्विकारु लागले. आपल्या देशातही भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या

कलमानुसार सार्वत्रिक प्राथमिक सक्तिच्या शिक्षणाची सोय करण्याची जबाबदारी आपल्या राज्यकर्त्यांनी स्विकारली आहे.[८] ती पार पाडण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जात आहे. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यांसारख्या देशात प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी मुख्यत: स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात आली आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना कायदेशीर अधिकारही देण्यात आले आहेत. अगदी सुरवातीला १९ व्या शतकात इ.स. १८८५ मध्ये शहरातील नागरी सेवा सुधारावी म्हणून मुंबईत स्थानिक स्वराज्य संस्था सुरु करण्यात आल्या. शहरात स्वच्छता राखणे, दिवाबत्तीची सोय करणे, रस्ते तयार करणे, दुरुस्त करणे अशी काही कामे स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सोपविण्यात आली होती.[९] कराद्वारे व अनुदानातून मिळालेला पैसा खर्च करण्याचा अधिकार त्यांना मिळाला. स्थानिक संस्थांनी सुरु केलेल्या शिक्षणाच्या कामात सुरवातीला फारच घोटाळे होऊ लागले. हारटॉग समितीने स्थानिक संस्थांच्या अधिकारावर टीका केली. अधिकार चुकीच्या गृहीतकृत्यावर दिलेले असून जरुरीपेक्षा जादा दिलेले आहेत. त्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्था शिक्षणात चांगले काम करु शकल्या नाहीत.[१०]

स्थानिक समित्यांकडे शिक्षणाचे प्रशासन देण्याच्या इंग्लंडच्या प्रभावी परंपरेचा प्रभाव, भारतीय शिक्षणाचे धोरण निश्चित करताना होणे साहजिकच आहे. त्यामुळेच भारतीय शिक्षणाच्या प्रशासनात स्थानिक समित्यांना आपला सहभाग द्यावा लागला.

याशिवाय अन्य कारण म्हणजे इ.स. १८८० पर्यन्त सुशिक्षित भारतीय आपल्या हक्काबद्दल जागरुक झाले व राजकीय स्वातंत्र्यसंघर्षाचे बीज रोवले गेले. त्याचा परिणाम म्हणून, स्थानिक समित्यांना शिक्षण प्रशासनात सहभाग दिला हे राजकीय कारणही महत्वाचे आहे.

इ.स. १८१३ ते १८८२ या कालखंडात ब्रिटीश सरकारने आरंभी नागरी

विभागात नगरपालिका प्रशासनाची निर्मिती केली. त्यानंतर ग्रामीण विभागात शिक्षण खर्चाची तरतुद झाली. त्यासाठी स्थानिक दराने शिक्षण व इतर बाबींसाठी कर घेण्यास आरंभ झाला. याच काळात शासनाने स्थानिक समित्यांच्या निर्मितीची समस्या हाती घेतली. स्थानिक समित्यांना करवसुली व प्रशासनात सहभाग मिळाला. मात्र ख-या अर्थाने स्थानिक समित्या नव्हत्या. तो भारतीय लोकाना अधिकार देण्याचा केवळ एक उपचार होता. स्थानिक युरोपीय अधिका-यांच्या अहवालपूर्तीचा तो केवळ एक सहभाग होता. अधिकाराच्या विकेन्द्रीकरणाचा प्रभाव वाढला होता. स्थानिक समित्यांना थोडे अधिकार दिले होते तरीही प्रत्यक्षात युरोपीय अधिका-यांनी स्थानिक समित्यांना तेही अधिकार उपभोगू दिले नव्हते.

इ.स. १८८२ ते १९१८ या काळात लॉर्ड रिपन यांचा स्थानिक स्वराज्य संस्थाचा ठराव व भारतीय आयोगाने [हंटर कमिशन] सुचविलेली विविध शिफारशींची मालिका या दोन महत्वाच्या बाबी घडल्या, त्याचा परिणाम म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांना शिक्षणाबाबत जादा अधिकार व स्वायत्तता मिळाली. विविध महत्वाचे बदल झाले.

१] ग्रामीण विभागापासून शहरी विभागावर होणारा खर्च स्वतंत्र करण्यात आला. नगरपालिकांवर त्यांच्या शिक्षणखर्चातील वाटा उचलण्यावर कायद्याने जबाबदारी आली.

२] स्थानिक दराने ग्रामीण विभागात निधी उभारून तो राज्यसरकारच्या शेतसा-याहून स्वतंत्र ठेवला त्यामुळे स्थानिक दराने उभारलेल्या निधीचा वर्षाच्या शेवटी शिल्लक राहीलेला निधी, पुढील वर्षासाठी शैक्षणिक खर्चास बोर्डाकडून उपलब्ध होऊ लागला. हा एक फायदा झाला.

३] सन १८८२ पूर्वी स्थानिक कमिटी प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच उच्च-शिक्षणावरही निधी वापरत असे. हंटर कमिशनने "प्राथमिक शिक्षण

हे सर्व शिक्षणाचाच एक भाग असून तो स्थानिक निधीतून वगळला जावू नये अशी शिफारस केली."[११] सरकारने ती शिफारस स्वीकारली. प्रत्यक्षात मात्र आपल्या क्षेत्रात उच्चशिक्षणावर निधी पुरविणाऱ्या स्थानिक संस्थांना तशी परवानगी दिली गेली.

४] सन १८७० पूर्वी स्थानिक संस्थांना त्यांनी खर्च केलेल्या शिक्षणखर्चावर अनुदान द्यावे की नाही ही खुली समस्या होती. लॉर्ड मेयोनी स्थानिक संस्थांना त्यांनी केलेल्या शिक्षणखर्चावर राज्यनिधीतून अनुदान द्यावे असे धोरण जाहीर केले.

५] हंटर कमिशनने ही स्थानिक स्वराज्य संस्थाकडे अधिकार द्यावेत, त्यांना स्थानिक प्रशासनात प्रभावी स्थान द्यावे अशी शिफारस केली. तेथून पुढे राज्य सरकारने तीन महत्वाची धोरणे निश्चित केली.

अ] स्थानिक संस्थांचा विकास व लोकशाहीकरण.

ब] योग्य व विस्तृत अनुदान पुरवठा आणि

क] शैक्षणिक संदर्भात स्थानिक संस्थांना विस्तृत अधिकाराचे संक्रमण.

प्रत्यक्षात मात्र या शिफारशी राबविताना सरकारने दुर्लक्ष करुन जिल्हा अधिकारी यांचेकडे जबाबदारी सोपविली. त्यामुळे १९१८ पर्यन्त स्थानिक स्वराज्य संस्था मर्यादित कार्य करु शकल्या. त्यांना फारसे अधिकार उपभोगता आले नाहीत. सन १९१९ ते १९२९ या काळात विकेन्द्रीकरण कमिटीने [१९०९] स्थानिक संस्थाना अधिकार देण्याची शिफारस केली. इ.स. १९१० मध्ये नामदार गोखले यांनी सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक संस्थांवर सोपविण्याबाबत आंदोलन उभारले. सन १९१८-१९ च्या मॉंटेग्यू चेम्सफर्ड रिपोर्टने भारतीय स्थनिक समित्यांच्या वाढीवर जोर दिला, व १९१९ च्या कायद्याने स्थानिक संस्थांच्या इतिहासात नविन पान उघडले. भारतीय मंत्र्याच्या नियंत्रणाखाली, स्थानिक स्वराज्याच्या अधिकारात शिक्षण खाते आले. प्रशासनाच्या या बदलत्या यंत्रणेत महत्वाचे तीन

बदल झाले.

सक्तीच्या, मोफत व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावर भर देवून निरक्षरता निर्मूलन, स्थानिक संस्थांना अधिकाधिक अधिकार व अंतर्गत स्वायत्तता.

प्राथमिक शिक्षण प्रशासनास स्थानिक संस्थांना जबाबदार धरणे, असे धोरण निश्चित केले. त्यामुळे ब्रिटीश सत्तेच्या भारतातील सर्व राज्यात प्राथमिक शिक्षण कायदे संमत झाले. या कायद्यामुळे पूर्वी कधीही नाही इतक्या प्रमाणात स्थानिक संस्थांकडे प्राथमिक शिक्षण प्रशासनाचे अधिकार सोपविण्यात आले.

"सन १८१८ ते १९२९ हा काळ म्हणजे शिक्षणातील अधिकार व जबाबदाऱ्या संदर्भातील क्रांतीचे पर्व होय."[१२]

१९२३ च्या कायद्याने कोणतीही शैक्षणिक पात्रता नसलेले अशिक्षित व शिक्षणाविषयी आस्था नसलेले लोक स्थानिक नियंत्रक संस्थात निवडून येवू लागले. भ्रष्टाचार माजला. शाळा तपासणी अधिकारी स्कूल बोर्डाच्या हातची बाहुली बनली. अपात्र माणसे वशिल्याने वरचे पद मिळवू लागली. प्रशासन व्यवस्था अकार्यक्षम ठरली. एक प्रकारचे अराजक निर्माण झाले."[१३]

सन १९२३ च्या कायद्याने प्रशासनाचे व्यापक अधिकार स्थानिक संस्थाना दिले. "एकदा अधिकार बहाल केल्यानंतर सरकारला स्थानिक संस्थावर नियंत्रण करणे कठीण जाऊ लागले. अशिक्षित समाज, अदूरदर्शीपणा असलेले शिक्षणाधिकारी व आर्थिक टंचाई यामुळे या कायद्याने समोर ठेवलेली उद्दिष्टे अजिबात साध्य झाली नाहीत."[१४] तेव्हा प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासन व कार्यपध्दतीत मूलगामी बदल केले पाहीजेत असे शिक्षणतज्ज्ञांना वाटू लागले. म्हणून स्थानिक शिक्षण नियंत्रक संस्थांचे अधिकार मर्यादित करण्याच्या हेतूने, "दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन [अमेन्डमेन्ट] ॲक्ट १९३८" हा कायदा पास झाला. या कायद्यातही अनेक त्रूटी आहेत हे नंतर लक्षात

आले व हा कायदा रद्द करा अशी चळवळ १९३८ च्या अखेरीस सुरु झाली.

या कायद्याने स्कूलबोर्ड व शिक्षणखाते यांच्यात समन्वय साधला नाही. म्हणजे ज्याला प्रशासनाचे अधिकार मिळाले त्याला पुरेशी माहिती नाही, तर ज्याला अधिकार नाहीत त्याला माहिती आहे. स्थानिक संस्थाचे अधिकारक्षेत्र मर्यादित केल्याने त्यांचेही सहकार्य मिळेना अशी स्थिती झाली. या कायद्याने कोणाचेच समाधान झाले नाही.[१५] या कायद्यान्वये स्थानिक नियंत्रक संस्थांचे अधिकार कमी झाले. सन १९२३ च्या कायद्याने स्थानिक संस्थांच्या बरोबर राज्य सरकारचेही नियंत्रण असणे आवश्यक आहे. "लोकशाहीची पथ्ये समाजाच्या पचनी पडलेली नसल्यामुळे मिळालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला जाऊन, लोकशाहीचे विडंबन झाल्यास शासनाचा हस्तक्षेप अपरिहार्य ठरत असतो. त्यामुळेच प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाची सर्व सूत्रे सरकारने आपल्या हातात ठेवली आहेत."[१६]

वरील सर्व कायद्यातील उणीवा ध्यानी घेऊन सन १९४७ चा प्राथमिक शिक्षणाचा कायदा व १९४९ चे त्यावरील अधिनियम शासनाने प्रसारीत केले. या कायद्याने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले. जिल्हा व नगरपालिका स्कूल बोर्डाकडे प्राथमिक शिक्षणाचा संपूर्ण ताबा आला. शासनाशी पत्रव्यवहारसमी दळणवळण सोपे झाले. शासनाधिका-यांच्या अधिकारावर लोकप्रतिनिधींचा थोडाफार अंकुश आला. शिक्षकांच्या नेमणुका व शिक्षा वगैरेसाठी अपील करणे, ट्रिब्युनल व स्टाफ सिलेक्शन समिती नेमण्यात आली. त्यात स्कूल बोर्डाचे चेअरमन, शासनाधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकारी [प्रत्यक्षात त्यावेळी विभागीय शिक्षणाधिकारी असत. पुढे सन १९५३ पासून जिल्हा शिक्षणाधिका-यांच्या नेमणुका झाल्या.] यांचा समावेश असे.[१७]

याखेरीज शिक्षकांना सिलेक्शन ग्रेड देण्यासाठी कमिटीही नेमण्यात आली. हीत स्वत: प्रशासन अधिकारी, डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर व एज्युकेशनल इन्स्पेक्टर हे सदस्य असावयाचे.

या कायद्यातील तरतुदीमुळे शिक्षणाचा प्रसार खेडोपाडी झाला. हजेरी वाढविण्यास व चुकार मुलांच्या पालकांवर खटले भरण्यास अटेंडन्स ऑफिसरच्या नेमणुका करण्यात आल्या.

हा कायदा निर्विवादपणे चांगल्या प्रकारे हाताळला जात होता. पण सरकारच्या मनात प्रत्येक जिल्हयाची विकास योजना त्या त्या जिल्हा परिषदांकडे देण्याचे ठरल्याने सन १९६१ ला पंचायत समिती कायदा अंमलात आला. त्यासाठी त्यायोगे इतर खात्यांबरोबर शिक्षण खातेही जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आले. प्रत्येक जिल्हा परिषदेत एक मुख्य कार्यकारी अधिकारी व त्याच्या हाताखाली इतर अधिकारी मार्गदर्शनाप्रमाणे कार्यरत असतात.

पूर्वी ते प्राथमिक शिक्षक जिल्हा स्कूल बोर्डाकडे होते त्यांना या कायद्यातील कलम २४१ अन्वये हयांचे पूर्वीचे हितसंबंध व अटी कायम ठेवून जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आले.

तसे पाहिले असता सन १९४७ चा कायदा अंमलबजावणीत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्वाधिकारी असल्याने त्याच्या सुचनेनुसार कार्यवाही करावयाची असते. आता स्टाफ सिलेक्शन कमिटी जाऊन जिल्हा व विभागीय निवड मंडळे आली आहेत व ट्रिब्युनल ऐवजी विभागीय कमिशनर व थेट प्रांतिक शिक्षकांना सरकारी नोकरांइतके किंबहुना त्यांच्या विविध संघटनामुळे अधिक स्थैर्य आले आहे. पेन्शन योजना व त्यात फॅमिली पेन्शन योजनेची गंगा खासगी मान्य प्राथमिक शाळातील शिक्षकांपर्यन्त वाहात आली असल्याने शिक्षकांनी निर्भयपणे व प्रामाणिकपणे अध्यापन कार्य करण्यात त्यांचे, मुलांचे व अप्रत्यक्ष देशाचे हित आहे.

महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रशासन [इ.स. १९६० नंतर] भारतीय घटनेत नमुद केल्याप्रमाणे शिक्षण ही बाब राज्य सरकारच्या अखत्यारीत असल्यामुळे राज्यातील शिक्षणविषयक नियोजन करणे, त्यासाठी लागणारी

आर्थिक व्यवस्था करणे, राज्याच्या अंदाजपत्रकात शिक्षणासाठी खर्चाची तरतुद करणे या गोष्टी राज्य सरकारला कराव्या लागतात. अशी आर्थिक तरतुद केन्द्र सरकारचे अनुदान, खाजगी संस्था व व्यक्ती यांचेकडून मिळणारी देणगी पैसा एकत्र करावा लागतो. शिक्षणविषयक राज्याची जबाबदारी पार पाडत असताना शिक्षणाच्या भिन्न भिन्न स्तरावर कायदे करून शिक्षणविषयक धोरण अंमलात आणावे लागते. उदा. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा विद्यापीठाचा कायदा, माध्यमिक शिक्षण विषयक कायदा, जिल्हा परिषद कायदा, असे कायदे करून त्या त्या स्तरावर शिक्षणाचा प्रसार व नियोजन केले जाते.

सन १९६१ च्या कायद्याने ग्रामीण शिक्षण प्रशासन यंत्रणेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून बदल केलेले आहेत. या कायद्याचे हेतू "प्रशासन यंत्रणेचा जिल्हा हा घटक मानून निर्णयांच्या कार्यवाहीतील दिरंगाई व शिथिलता टाळते व जिल्हा ते ग्रामपातळीवरील कार्यात सुसूत्रता आणणे" हे आहेत.[१८]

प्राथमिक शिक्षण प्रशासन व्यवस्थेसंदर्भातील कायदेशीर तरतुदीबाबत या पध्दतीने बदल होत आले आहेत. त्यानंतर इ.स. १९६४ मध्ये कोठारी शिक्षण आयोगाची "राष्ट्रीय शिक्षण योजने"चा विचार करण्यासाठी नियुक्ती झाली. त्या आयोगाने संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा आधुनिक दृष्टीकोनातून विचार करून विस्तृत अहवाल राष्ट्राला सादर केला. [१९६६][१९]

राष्ट्रीय पातळीवर विचारमंथन होऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ साली स्वीकारण्यात आले. सार्वत्रिक पटनोंदणी, कृतिप्रधान शिक्षण, साहित्य साधनांचा पुरेसा पुरवठा, वर्गखोल्या, आधुनिक तंत्रे व साधने यांचा विकास, जिल्ह्याच्या ठिकाणी प्रशिक्षण सोयी, सहली, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमास प्राधान्य इत्यादी बाबी लक्षणीय मानल्या गेल्या. व्यवस्थापनाच्या कार्यात बदल करून मूल्यमापन मंडळे स्थापना करणेचा व परिणामकारक यंत्रणा

उभारण्याचा मानस होता.[२०]

१९९० मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार करण्यासाठी आचार्य राममूर्ती यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने केलेल्या शिफारशींचा विचार करुन सुधारीत शैक्षणिक धोरणाचा पुनरूच्चार १९९२ मध्ये करण्यात आला. इ.स. २००० पर्यन्त अंमलात आणावयाच्या विविध योजनांचा समावेश धोरणात व कृतीकार्यक्रमामध्ये आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स यासारख्या लोकशाहीप्रधान व शैक्षणिकदृष्टया प्रगत असलेल्या राष्ट्रात स्थानिक नियंत्रक संस्थाना फार महत्व आहे आणि ते अगदी स्वाभाविकच आहे. लोकशाहीप्रधान राष्ट्रात प्रशासनाचे विकेन्द्रीकरण हे एक गृहीत बाबच असते.

"लोकशाही विकेन्द्रीकरणाद्वारे शिक्षण हे ख-या अर्थाने लोकाभिमुख झाल्याशिवाय लोकशाही यशस्वी होणे शक्य नसते. सर्वसामान्य जनता हा लोकशाहीचा कणा असल्याने तो जितका भक्कम व ताठ असेल तितक्या प्रमाणात लोकशाही राष्ट्राची मान उंचावत असते. हा कणा भक्कम करण्याचे, ताठ ठेवण्याचे साधन म्हणजे शिक्षण."[२२]

सर्वसामान्य नागरिक जोपर्यन्त शिक्षणाच्या या महान प्रयोगात समान भागिदार म्हणून समाविष्ट होत नाहीत तोपर्यन्त त्यांना शैक्षणिक प्रसाराची तळमळ लागणे शक्य नाही असे तज्ज्ञांचे मत आहे.

सर्वसामान्यांच्या या प्रयोगात भागीदार करण्याचे उत्कृष्ठ माध्यम म्हणजे स्थानिक संस्था होत. त्या रद्द करणे म्हणजे लोकशाहीत उपेक्षित असलेल्या व्यक्ति-स्वातंत्र्याच्या कल्पनेवर व शैक्षणिक प्रशासनाच्या उद्दिष्टांवरच प्रहार करण्यासारखे आहे असे लॉर्ड रिपनचे भाकित आहे.

देशातील सरकारने ठरवलेले शैक्षणिक धोरण कार्यवाहीत आणणे, शिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे साध्य होत आहेत काय यावर लक्ष ठेवून ती सर्व प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कोणत्याही राजकीय पक्षाचा अभिनिवेश न बाळगता

कोणत्याही एकाच तत्वप्रणालीचे दास न बनता सतत प्रयत्नशील राहणे, देशात विविध पातळीवरून दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या शिक्षणाचे नियमन करणे, त्या बहुविध शैक्षणिक संस्थाचे त्यांच्या प्रयत्नांचे, विचारांचे एकसुत्रीकरण करणे आणि तरीही प्रयोगशीलतेला भरपूर वाव ठेवणे, लोकमत व राज्यशासक मत यांत सुसंवाद राखण्याचा प्रयत्न करणे ही प्रशासन यंत्रणेची प्रमुख कर्तव्ये आहेत.

"जीवंत मानसांनी जीवंत व्यक्तिकरता, जीवंत माणसाद्वारा कार्यान्वित केलेले सूत्रबध्द परंतू स्वतंत्र कल्पनांची गळचेपी होऊ न देता अंमलात आणलेले शैक्षणिक धोरण म्हणजेच शैक्षणिक प्रशासन होय."[२३]

शैक्षणिक प्रशासनव्यवस्थेशिवाय कोणताही शैक्षणिक प्रयोग यशस्वी होऊ शकत नाही. सध्या प्राथमिक शिक्षण स्तरावर प्रामुख्याने जिल्हा परिषद व नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळा याशिवाय कांही खाजगी प्राथमिक शाळा शिक्षणाचे कार्य करतात. संशोधकाला जिल्हयातील विविध प्राथमिक शाळात संघटनेच्या कामासंदर्भात जाण्याची संधी मिळते. त्यावेळी विविध घटकांचे व्यवस्थापन, शासन कार्यवाही, गुणदोष, संशोधकाला पहावयास मिळतात.

मुख्याध्यापक, केन्द्रप्रमुख, अधिकारी वर्ग यांच्याशी वेळोवेळी चर्चा करण्याची संधी मिळाल्याने शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षक-मुख्याध्यापकांच्यामधील आंतरक्रिया, प्रशासन, नियोजन, वर्ग अध्यापन या बाबीसंबंधी माहिती मिळत असे. संशोधकाला शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा घसरत चालला आहे असे काही ठिकाणी दिसून आले. शासन, समाज, शिक्षक यांच्या परिश्रमातून शिक्षणाची गुणवत्ता पाहीजे त्या प्रमाणात वाढत नाही. यास जबाबदार कोण ? ही समस्या संशोधकास अस्वस्थ करते. या संक्रमणावस्थेतच एम. फिल. अभ्यासक्रम पूर्ण करताना शैक्षणिक प्रशासन या वैकल्पिक विषयासंदर्भातीलच संशोधन समस्या निवडणे अनिवार्य असल्याने शैक्षणिक संशोधनाच्या क्षेत्रात शैक्षणिक प्रशासनासंदर्भात झालेल्या संशोधन कार्याचा स्थुल अभ्यास केला,

त्यावेळी असे जाणवले की, शिक्षण प्रशासकाची भूमिका या बदलत्या समाजरचनेत कशी असावी या विषयावर कोणी अभ्यास केलेला नाही. या स्तरावर विविध समस्या आहेत. सामाजीक बदलातून आजचे शिक्षण प्रभावी झाले पाहीजे. या शिक्षणप्रक्रियेवर शैक्षणिक प्रशासनाचा प्रभाव आहे. ते शैक्षणिक प्रशासन कसे आहे ? प्रशासनामध्ये प्रशासकाची भूमिका कोणती ? या विषयाचा अभ्यास करणे ही सद्यस्थितीची एक गरज आहे असे संशोधकाचे मत होऊन संशोधन करावयाचे निश्चित केले.

१.२] समस्येचे विधान -

"बदलत्या समाजरचनेत सांगली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक स्तरावरील शिक्षण प्रशासकाची भूमिका."

"ROLE OF PRIMARY LEVEL EDUCATIONAL ADMINISTRATION IN THE CHANGING SOCIAL STRUCTURE OF SANGLI ZILLA PARISHAD."

१.३] समस्येचे महत्व -

स्वातंत्र्योत्तर कालावधीमध्ये भारत सरकारने देशातील जनतेच्या शिक्षणाचे महत्व ओळखून त्या संदर्भात विविध निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्र शासन तर शिक्षण प्रसाराबाबत एक अग्रेसर राज्य म्हणून गौरविले जाते. अशा या प्रगत पुरोगामी राज्यातील प्राथमिक शिक्षणाकडे केवळ शिक्षणाचा आरंभीचा टप्पा एवढयाच दृष्टीने पाहणे अयोग्य होय. वास्तविक प्राथमिक शिक्षण हा टप्पा प्रथम प्राधान्याचा टप्पा म्हणूनच त्याकडे पाहणे व त्याचदृष्टीने या शिक्षणाच्या प्रशासनाचे नियोजन व कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासन व्यवस्थेतही एक वेगळेपण जाणवते. बळवंतराय मेहता अभ्यास गटाच्या [१९५६-१९५७]

शिफारशींचा विचार करणेस १९६० मध्ये महाराष्ट्र सरकारने नाईक समिती नेमली. या समितीने आपल्या अहवालात लोकशाही विकेन्द्रीकरणाचा पुनरुच्चार केला व त्या आधारे "महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९६१" विधीमंडळाने संमत केला. या नाईक समितीने जिल्हा स्थानिक मंडळे, जिल्हा शिक्षण मंडळे, जिल्हा ग्रामपंचायत मंडळे या तळातील मंडळांचा अभ्यास केला.

ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद यांच्या प्रशासनव्यवस्थेवर कालानुरूप व आवश्यकतेनुसार कायदेशीर तरतुदी झाल्या. म्हणजेच ग्रामीण विभागातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाच्या संदर्भात आवश्यक ते बदल झाले. या बदलाचा शिक्षणप्रक्रियेवर कोणता परिणाम झाला हे अभ्यासणे गरजेचे आहे. ग्रामीण विभागामध्ये प्राथमिक शिक्षणाची अवस्था दयनीय व धक्कादायक आहे. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा घसरत आहे, शिक्षकाची, प्रशासकाची समाजातील प्रतिष्ठा कमी होत आहे, या आशयाच्या बातम्या, लेख वृत्तपत्रातून नेहमी येतात. खरोखरच अशी अवस्था सर्व ठिकाणी आहे काय ? अपवादात्मक घटक वगळता तशी अवस्था आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल. शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तिंनी, प्रशासकांनी नवी आदर्श पिढी घडविण्यासाठी आपली भूमिका योग्य अशी वठविली पाहिजे. कर्तव्याची जाण ठेवून प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहीजे. भ्रष्टाचारापासून दूर राहीले पाहीजे. तरच शिक्षणकार्य यशस्वी होणार आहे असे विविध शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

सांगली जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या शाळा या ग्रामीण भागातच आहेत. हा अभ्यास ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाच्या सर्व घटकांशी संबंधीत असून नियोजक, निरीक्षक, प्रशासक, व्यवस्थापक व वित्त-सहाय्य करणारे घटक यांनाही उपयुक्त ठरेल असा संशोधकास विश्वास वाटतो.

१.४] <u>समस्येची निवड -</u>

"शिक्षण म्हणजे सर्वांग सुंदर जीवन जगण्याची तयारी" अशी व्याख्या थोर तत्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सरनी [१८२०-१९०३] केली आहे. व्यक्तिचे जीवन इतर व्यक्तिंच्या सहवासात व भिन्न प्रकारच्या सामाजिक परिसरात व्यतित होत असते. व्यक्ति समाजात राहते व त्या सामाजिक वातावरणाचा व्यक्तिवर सतत संस्कार होत असतो. म्हणून शिक्षणाचा विचार करताना सामाजिक संबंधाचाही विचार करावा लागतो.

समाजशास्त्रज्ञ 'ओटावे' यांच्या मतानुसार "शिक्षण म्हणजे सामाजिक प्रक्रिया होय." समाजशास्त्रज्ञ जॉन ड्युई म्हणतात की, "शिक्षण हे सामाजिक गरजामधुन सुरु झाले पाहीजे. शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चांगल्या व्यवस्थापनाची गरज असते. व्यवस्थापनामध्ये प्रशासन हा भाग अनिवार्य आहे." आजच्या शिक्षण पध्दतीमध्ये शैक्षणिक नियोजन व प्रशासन या प्रक्रियेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. या प्रक्रियेमध्ये विद्यार्थी, शिक्षक, समाज, संस्था व शासन यांचा समावेश होतो. याशिवाय राष्ट्रीय शिक्षण पध्दती व धोरण यांचा विचार करुन शिक्षणाचे एक अखंड सुत्र राखावे लागते.

आजच्या विज्ञानयुगामध्ये समाजातील प्रत्येक व्यक्तिच्या आशा-आकांक्षा व गरजा वाढत आहेत. साधनांची व यंत्रांची कमतरता भासत आहे. आजच्या समाजरचनेची व सामाजिक बदलांची चाहूल घेतली तर भविष्यकाळामध्ये विविध समस्यांची एक मालीका तयार होईल असे संशोधकाचे मत आहे. सद्यस्थितीत शिक्षणसेवेत जबाबदारीच्या पदावर काम करणाऱ्या व करु इच्छिणाऱ्या प्रशासकाच्या कार्याला नैतिक, सामाजिक, व्यावसायिक मूल्यांचा पाया असल्याशिवाय शिक्षणकार्य यशस्वी व परिणामकारक होणार नाही.

संशोधक हा प्राथमिक शिक्षक असून आपला व्यवसाय करीत असताना व्यवसायाशी संबंधित त्यास अनेक अडचणी आल्या आहेत. शिक्षक, मुख्याध्यापक

व अधिकारी वर्ग यांच्यातील आंतरक्रिया, सेवांतर्गत प्रशिक्षण, प्रचलित प्रशासन पध्दती, प्रशासकाची कार्यपध्दती, अधिकार व कर्तव्ये, शैक्षणिक धोरणे व त्यांची फलश्रुती या बाबी संशोधकाचे पूर्ण समाधान करीत नाहीत. सद्यस्थितीत शिक्षणप्रक्रियेचा जास्त भार प्रशासनावर अवलंबून आहे. यासाठी प्रशासनामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हयापासून ग्रामपातळीपर्यन्त सर्व प्रशासकांच्या भूमिकेचा अभ्यास करण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे.

१.५] संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा -

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शिक्षणाचा प्रसार द्रुत गतीने झाला. याबरोबरच अनेक नविन समस्या व प्रश्न प्रशासक, व्यवस्थापक यांच्यासमोर उभे राहीले. या समस्यांचे अभ्यासपूर्ण निरीक्षण करण्यासाठी संशोधन हे उपयुक्त साधन आहे. संपूर्ण देशामध्ये शिक्षणासाठी सक्रिय आणि गतिमान होण्याचे प्रयत्न चालू आहेत. शिक्षणक्षेत्राशी संबंधित अनेक विषयावर अभ्यास, संशोधने सुरु आहेत. शिक्षणप्रक्रिया गतिमान होण्यासाठी कोणते प्रयत्न झाले पाहीजेत ? शासन धोरण व प्रशासनाचे स्वरुप काय असावे ? शिक्षण क्षेत्रातील धोरण ठरविणा-या प्रशासकांना संशोधन वृत्तीची गरज आहे. सद्यस्थितीत जबाबदारीच्या पदावर काम करणा-या व भावी काळात काम करु इच्छिणा-या प्रशासकाला आपल्याला अधिकार कोणते आहेत ? आपली कर्तव्ये कोणती ? समाजाच्या अपेक्षा व प्रचलित शिक्षणपध्दती कशी आहे ? प्रशासकीय समस्या व त्रुटी कोणत्या ? व त्यावर कोणती उपाययोजना करावी ? या विषयावर संशोधन होणे संशोधकास आवश्यक वाटले म्हणून या विषयावर अभ्यास करण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

या संशोधन विषयामध्ये जिल्हा परिषद [स्थानिक स्वराज्य संस्था] पातळीवरुन जे प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागामध्ये दिले जाते त्यांचे व्यवस्थापन व प्रशासन कसे चालते व त्यातील अडचणी कोणत्या या विषयाचे विवेचन केले आहे. हे संशोधन जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण स्तरावर प्रशासक म्हणून

काम करणा-या सर्व प्रशासकांना उपयोगी पडेल असे आहे.

सांगली जिल्हा शिक्षणाधिकारी [प्राथमिक], उपशिक्षणाधिकारी, अधिक्षक, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी, तालुका मास्तर केन्द्रप्रमुख, मुख्याध्यापक इत्यादी प्रशासकांचे अधिकार व कर्तव्ये आणि अडचणी या विषयाचा चिकित्सक अभ्यास करुन बदलत्या समाजरचनेत प्रशासकाचे प्रभावी प्रशासन कसे होईल यासाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रशासनावर परिणाम करणा-या सामाजिक व शासकीय तसेच राजकीय घटकांचाही अभ्यास संशोधकाने करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये सांगली जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, शिक्षण सभापती, कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, शिक्षणप्रेमी व्यक्ती व शिक्षणतज्ज्ञ यांच्या प्रभावाचा व सहभागाचा अभ्यास केला आहे.

<u>मर्यादा</u> -

या संशोधनामध्ये सांगली जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण स्तरावरील प्रशासकांचा [शैक्षणिक] व प्रशासनावर प्रभाव टाकणा-या सांगली जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय घटकांचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास जिल्हा व तालुका पातळीवरील प्रशासनाशी संबंधीत आहे. यामध्ये शैक्षणिक प्रशासनावर प्रभाव टाकणा-या इतर शासकीय घटकांची थोडक्यात माहिती दिली आहे. शैक्षणिक प्रशासनावर प्रभाव टाकणा-या राजकीय घटकापैकी जिल्हा व तालुका पातळीवरील पदाधिका-यांच्या भूमिकेचा अभ्यास केला आहे. हे संशोधन जिल्हा परिषदेच्या अधिकार क्षेत्रातील शाळा व प्रशासनासंबंधी आहे. यामध्ये खाजगी व नगरपालिका नियंत्रणाखालील शाळांच्या शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास समाविष्ट केला नाही. या संशोधनामध्ये प्रामुख्याने सांगली जिल्ह्यातील शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास केला आहे. या संशोधनाचा उपयोग जिल्हा परिषद तालुका, केन्द्र पातळीवरील सर्व ठिकाणच्या प्रशासकाना होईल.

१.६] <u>संशोधन विषयाची उद्दिष्टे</u> -

१] प्रशासकाच्या अधिकारक्षेत्राचा चिकित्सक अभ्यास करणे.

२] प्रशासकाची कर्तव्ये व प्रत्यक्ष कार्यवाही यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३] बदलत्या समाजरचनेनुसार २१ व्या शतकातील समाजाच्या अपेक्षेचा अभ्यास करणे

४] प्रशासनाची योग्यता ठरवून शिक्षण व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी मार्ग सुचवणे.

५] समाजाची गरज आणि प्रशासकाचे प्रशासन यांच्यातील संबंधाचा शोध घेणे.

६] वर्तमान स्थितीतील प्रशासकाच्या समस्यांचा शोध घेणे.

७] प्रशासकाच्या भविष्यकालीन समस्येवर मात करण्यासाठी त्यांच्यामध्ये कार्यात्मक कुवत निर्माण होण्यास मदत करणे.

८] शिक्षणातील प्रशासकीय उद्दिष्टांची फलश्रुती पहाणे.

१.७] <u>समस्येतील पदांच्या व्याख्या</u> -

<u>Primary School</u> -

A School beginning with Class I and having classes upto VII. The term 'elementary school' has sometimes been used interchangeably.

<u>Elementary Education</u> -

Although the term is used for eight years of compulsory schooling as envisaged in the constitution; in this study the term has been used for education imparted in elementary schools; as this meaning is

more widely understood in the circumstances prevalent in the State. The term 'Primary Education' has also been interchangeably.

Block -

The Community Development Block or the smallest unit of administration for development purposes. There are 296 blocks in the State of Maharashtra.

Zilla Parishad -

A local body of public representatives responsible for development of rural areas constituted under the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

Extension Officer (Education) -

A supervisor under the Zilla Parishad administration appointed for supervision of a group of about 40 or less primary schools. The term Education Extension Officer has been used interchangeably.

Block Development Officer -

A general administrator under the Zilla Parishad, who is overall incharge of developmental administration is a block.

Block Education Officer -

An officer of the Education Department of the State Government deputed to the Zilla Parishad, who is responsible for overall administration of elementary education in a block.

Beat -

An area under the charge of an Extension Officer (Education)

Change, Social -

Change, Social Socialization change which has a direct kinship with the inter actional hierarchial control, parent-child relationships serving as the most obcious example.

Role -

The characteristic behaviour shown by an individual in a given societal contract.

Administrative Officer -

A member's of an educational staff with responsibilities in the direction control, or management of a school or schools in an educational system.

Primary Education -

That division of the elementary schools including gracles 1 to 3, devoted primarily to instruction in fundamental skills and the development of social attitudes necessary for democratic living.

केन्द्रप्रमुख -

१० प्राथमिक शाळांवर देखरेख व मूल्यमापनासाठी नेमलेला शिक्षक व मुख्याध्यापकांचा वरिष्ठ.

<u>शिक्षणाधिकारी</u> -

म्हणजे अधिनियम २१, २२ खाली नेमलेला अधिकारी [जो जिल्हा पातळीवर शैक्षणिक विषयांशी संबंधीत असतो.]

<u>सक्तीचे क्षेत्र</u> -

ज्या क्षेत्रात कोणत्याही वर्गापर्यन्त प्राथमिक शिक्षण सक्तिचे केले असेल ते क्षेत्र.

<u>मूल</u> -

शालेय वर्षाच्या सुरवातीला ज्याचे वय ६ वर्षापेक्षा जास्त आहे, व १४ वर्षापेक्षा कमी आहे.

<u>जिल्हा</u> -

अधिनियम ५ [एच्] आणि ६ व ११ च्या कलम आणि अधिकृत नगरपालिका आणि कटकमंडळे यांचे क्षेत्र वगळून मुंबई लॅन्ड रेव्हेन्यू कोर्ट अन्वये तयार झालेला.

<u>पालक</u> -

ज्याच्या ताब्यात मूल आहे अशी व्यक्ती.

<u>तालुका मास्तर</u> -

विस्तार अधिका-यांच्या कार्य विभागातील एका विभागातील आर्थिक व्यवहाराशी संबंधीत असतो तो मुख्याध्यापक.

<u>प्रशासन</u> -

नियोजन करणे, संघटित करणे, समादेश देणे, समन्वय करणे, नियंत्रण ठेवणे.

<u>नियोजन</u> -

विशिष्ठ काळात ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने उपलब्ध आवश्यक साधन-सामुग्री आणि मनुष्यबळाच्या सहाय्याने कृतीची कार्यवाही निश्चित करण्याची प्रक्रिया म्हणजे नियोजन.

पर्यवेक्षण -

शैक्षणिक प्रक्रियेत मार्गदर्शन करण्याची आणि समिक्षणात्मक मूल्यमापन करण्याची कार्यपध्दती.

शिक्षण समिती -

जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील प्राथमिक शिक्षण संदर्भातील जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पार पाडावयाच्या कर्तव्याव्यतिरिक्त नगरपरिषदेच्या शैक्षणिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी निवडलेली नगरपरिषद सदस्यांची समिती.

वित्तव्यवस्था -

सरकारची मान्यता असलेल्या, सरकारचे नियम व अटी पाळणाऱ्या सरकारी कायद्यान्वये सरकार दप्तरी नोंद झालेल्या संस्थांसाठी सरकारने उपलब्ध निधीतून नियमाप्रमाणे केलेली तरतुद.

शालेय वर्ष -

जिल्हा परिषद संचालकांच्या मंजुरीने ठरविल त्या तारखेपासून सुरू होणारे वर्ष.

व्यवस्थापन -

नियोजन करणे, निर्णय घेणे, समस्या सोडविणे, संघटन करणे, कामाची वाटणी करणे, मार्गदर्शन व प्रेरणा देणे, नियंत्रण करणे, देखभाल करणे या बाबींची विशिष्ठ सभासद असलेल्या मंडळाकडून केली जाणारी कार्यपध्दती.

कित्ता -

[ईबीड] त्याच पुस्तकातील.

उपरोक्त -

[लॉग सीट] वर उल्लेखलेल्या पुस्तकातील.

<u>पूर्वोक्त</u> -

[ऑफ सीट] अगोदर, पूर्वी उल्लेखलेल्या पुस्तकातील, त्याच पृष्ठावरील, त्याच संदर्भातील.

या अहवालात वर नमुद केलेल्या अर्थाने संज्ञांचा वापर संशोधकाने केला आहे.

-****-

## संदर्भ सूची


१] Education Department, Govt.of Maharashtra, : The Bombay primary education Act, 1947 (Revised ed.) Bombay, Government Centrel Printing Press, 1974.

२] सोहनी, श्री.प. : मानवी हक्क, (नाशिक, अशोक टिळक), नागरिक प्रेस, आग्रा रोड, १९६८, पृ.७

३] देशपांडे, के.ना., माळी, आ.ल. : मध्ययुगीन शिक्षणाचा इतिहास, (पुणे : नुतन प्रकाशन)

४] Education Department, Govt.of Maharashtra, : The Bombay Primary Education Rules, 1949, (Revised Edition), Bombay, Government Central Printing Press, 1974

५] Department of Education, Ministry of Human Resource Development : Elementary Education, Non-formal Education and Operation Blackboard, National Policy on Education, 1986: Programme of Action, (New Delhi), 1986

६] Shah, M.R. : Administration and Finance of Primary Education in the province of Bombay, (The local self Government press), 1950, Page 27

७] Patwardhan, C.N. : An Introduction to the study of Educational Administration in India, (Pune : Arya Sanskriti Mudranalay), Page 139

८] Naik, J.P.: Elementary Education in India, The Unfinished Business, (Bombay- Asia Publishing House) 1966, Page 3

९) Awasthi, A.A. (Ed.) : Municipal Administration in India, (Agra : Laxminarayan Agarwal), 1972, P.223

१०) बडे, जी. एस. : भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, उद्गम आणि विकास, (मुंबई : हिमालया पब्लिशिंग हाऊस), १९७८, पृ. १८, १९

११) जोशी, ग. ब., पाटणकर, ना. वि. : महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रशासन, (पुणे : ज्योति प्रकाशन), १९६१, पृ. ५३

१२) मुखार्जी, एस. एन्. : ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ एज्युकेशन इन इंडिया, (बडोदा : आचार्य बुक डेपो), १९६२, पृ. १०६

१३) जोशी, ग. ब., पाटणकर, ना. वि., उपरोक्त, पृ. ५७

१४) कित्ता, पृ. ५८

१५) कित्ता, पृ. ६०

१६) कित्ता, पृ. ७१

१७) Education Department, Govt.of Maharashtra, : The Bombay Primary Education Act, 1947, Ebid, 1

१८) वर्तक, र. म. : महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन आणि जिल्हा परिषद, (डोंबिवली : सुयोग), १९७५, पृ. ४४०

१९) शिक्षण आयोगाचा अहवाल (१९६४-६५) : (प्रका. समाज प्रबोधन संस्था)

२०) पारसनीस, न. रा. : शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका, (पुणे : नुतन प्रकाशन)

२१) नागपूरे, वसंत : सर्वांसाठी शिक्षण, प्रश्न-प्रयत्न-प्रगती, (जयदीप प्रकाशन) मनोगत, पृ. १

२२) जोशी, ग. ब., पाटणकर, ना. वि., उपरोक्त, पृ. १०३

२३) कित्ता, पृ. १०